

# हुमणी किडीची ओळख आणि जीवनचक्र



**प्रा. वैभव गिरी**
(मो.नं. ९१४६४१२२१०)
कृषी कीटकशास्त्र विभाग,
रामकृष्ण बजाज कृषी
महाविद्यालय, पिपरी, जि. वर्धा

**म**हाराष्ट्रात होलोर्ट्रॅकिया सेरेटा या हुमणीच्या प्रजातीपासून मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या जातीचे वैशिष्ट्य असे आहे की, ही जात हलक्या जमिनीत व कमी पाण्याच्या प्रदेशात जास्त आढळते. होलोर्ट्रॅकियाच्या प्रादुर्भावामुळे ऊसाच्या उगवणीत ३०% पर्यंत नुकसान होते. तसेच ऊस उत्पादनात जवळपास २० टनांपर्यंत नुकसान होते. यामुळे हुमणी किडीचा बंदोबस्त योग्य वेळी सर्वसाधारणपणे उन्हाळ्यात करणे अत्यंत गरजेचे असते. तसे बघता खरीप हंगामामध्ये हुमणी या किडीमुळे सर्वच पिकांचे नुकसान होते. परंतु भुईमूग, ज्वारी, बाजरी, मका व ऊस यासारख्या पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होते. हे टाळण्यासाठी किडीचा जीवनक्रम जाणून प्रौढ व अळी अवस्थांचा नाश सामुदायिकरित्या करणे आवश्यक आहे. हुमणी ही एक बहुभक्षी कीड आहे.

**हुमणीची अळी अवस्था :** प्रथम अळी अवस्था पांढरी शुभ्र, पिवळे डोके, सुमारे ८ मि.मी. लांबी. छातीवर पायांच्या तीन जोड्या. पूर्ण विकसित अळ्या पिवळट- सफेद, डोक्याचा रंग बदामी व इंग्रजीच्या सी (C) अक्षराप्रमाणे अर्धगोलाकार. पूर्ण विकसित अळीची लांबी सुमारे ४० ते ४५ मि.मी. (४ ते ५ सें.मी.) असते.

**प्रौढ भुंगेरा :** तपकिरी किंवा बदामी रंग. १८ ते २० मि.मी. लांब व ८ मि.मी. पर्यंत जाड. पंखाची प्रथम जोडी ढालीप्रमाणे मजबूत. पंखाची दुसरी जोडी पातळ व घडी करण्यासाठी लवचिक असते.

**हुमणी किडीची जीवनसाखळी :** पावसानंतर प्रौढ भुंगेरे सायंकाळी जमिनीतून बाहेर येतात व पिकांच्या मुळ्या कुरतडून खातात त्यामुळे पिकाचे अन्न व पाणी घेण्याचे कार्यच बंद पडते. ते दिवसा त्रास देत नाहीत. कडुलिंब, बाभूळ, बोर यासारख्या वृक्षांवर मादीसोबत मिलनासाठी जमतात. कोषावस्थेतून बाहेर आलेला भुंगेरा पुरेसा पाऊस पडेपर्यंत (४ ते ५ महिने) जमिनीत मातीच्या घरातच काही न खाता पडून राहू शकतो.

**आर्थिक नुकसानीची ओळख पातळी :** एक हुमणीची अळी प्रति एक घनमीटर अंतरात आढळून आल्यास कीड नियंत्रण सुरू करावे. याच काळात अळ्या बांधावरील यजमान झाडांची पाने खातात. रात्रीच्या वेळी प्रकाश सापळे लावून त्यांना आकर्षित करावे. संध्याकाळी व रात्री या झाडांच्या फांद्या जोरात हलवून प्रौढ खाली पाडावेत. ते गोळा करून केरोसिन वा कीटकनाशक मिश्रित पाण्यात टाकून नष्ट करावेत. हे काम सामुदायिकरित्या करणे अधिक फायदेशीर. त्यानंतर सूर्योदयापूर्वी ते पुन्हा जमिनीत परत जातात.

**अंडी घालण्याचा कालावधी :** हुमणी साधारणतः जून-जुलै या कालावधीतच अंडी घालते. जमिनीत साधारणपणे ८ ते १० सें.मी. खोलपर्यंत साबुदाण्याच्या आकाराची व लांबट गोल अंडी असतात. एक मादी तिच्या जीवनकाळात ६० ते ७० अंडी देते. अंड्यांतून ९ ते १० दिवसांत अळी बाहेर येते.

**अळी अवस्था- ५ ते ७ महिन्यांची :** जमिनीत ती १० ते १५ सें.मी. खोल अर्धगोलाकार (C) पडून राहते. हीच पिकासाठी नुकसानकारक अवस्था असते. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यानंतर अळी जमिनीत खोलवर कोषावस्थेत जाते. कोष तांबूस तपकिरी रंगाचा व टणक. कोषावस्था २० ते २५ दिवस असते.

**प्रौढ** - कोषातून निघणारे प्रौढ कीटक पहिल्या पावसापर्यंत जमिनीतच सुप्तावस्थेत असतात. भुंगेरे सुरवातीस पिवळसर पांढरट व कालांतराने तपकिरी होतात. भुंगेऱ्यांचे आयुष्य सुमारे ८० ते ९० दिवस (जवळपास ३ महिन्यांचे) असते. हुमणीची अशा प्रकारे एका वर्षात एक पिढी पूर्ण होते.

**नुकसान :** प्रथमावस्थेतील अळ्या पिकाची तंतुमुळे खातात. ती उपलब्ध नसल्यास सेंद्रिय पदार्थ खातात. तंतुमुळांचा फडशा पाडल्यानंतर मुख्य मुळे खाण्यास सुरू करतात. परिणामी झाड वाळते. एका झाडाचे मूळ कुरतडून खाल्ल्यानंतर हुमणी दुसऱ्या झाडाकडे वळते. शेतात एका ओळीत झाडे वाळल्याचे दिसून आले तर समजायचे की हुमणीचा प्रादुर्भाव आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर हे प्रामुख्याने नुकसान आढळणारे महिने असतात. ■